# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| सौं. सावित्री नामदेव कदम,<br>७९२/बी, रविवार पेठ, कोल्हापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर विभागीय कार्यालय, कोल्हापूर<br>३) उप कार्यकारी अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>मध्य उप विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौं. सावित्री नामदेव कदम यांनी दि १५.३.२०१० रोजी मंचाच्या अध्यक्षांचे नावाने अग्रेषित केला अर्ज दाखल केला. सदर अर्ज महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार तक्रार समजून नोंदला व वितरण कंपनीला नोटीस काढली.

तक्रारदार यांचे म्हणण्यानुसार  सि.स. नं. ७९२/बी, रविवार पेठ, कोल्हापूर ही पूर्णपणे त्यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीबाबत फसवणूक करुन आपले नांवे खरेदी करणे संबंधात श्री. रामचंद्र शं. नलवडे यांचे नावे दिवाणी न्ययालयात से.क.नं. १८०/२००५ नुसार दावा दाखल आहे.

श्री. रामचंद्र शं नलवडे यांचे नांवे विद्युत कनेक्शन देणे संदर्भात तक्रारदारांनी वि.प.च्या मध्य उप विभाग कार्यालयाकडे हरकत दाखल केलेली होती. तसेच श्री. रामचंद्र शं. नलवडे यांना विद्युत कनेक्शन कोणत्या निकषावर दिले आहे त्याचा खुलासा संबंधिताकडून मंचामार्फत मिळावा व सदरचे कनेक्शन नियमबाह्य वाटलेस त्वरित बंद करणेचे लेखी आदेश व्हावेत अशी मंचास विनंती केली आहे. मंचाकडे अपील दाखल करण्यापूर्वी तक्रारदार यांनी क्ष फॉर्ममध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे तक्रार दाखल केल्याचे दिसते. अंतर्गत कक्षाने आपल्या दि. १५.२.२०१० च्या आदेशात उप कार्यकारी अभियंता, मध्य उप विभाग, कोल्हापूर यांनी कनिष्ठ विधी अधिकारी यांचे मत १५ दिवसांत नोंदवून घ्यावे व त्यानुसार कार्यवाही करावी असे आदेश दिले.  तक्रारदाराने आपल्या अर्जासोबत मालमत्तापत्रक, दि. २२.२.२०१० चे वीज देयक भरल्याची पावती, देयकाची झेरॉक्स व श्री. एस.डी. कोळेकर वकिलांनी श्री. रामचंद्र शं. नलवडे यांना पाठविलेली दि. १४.७.२००४ ची नोटीसीची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे.  तसेच दावा क्र. १८०/२००५ ची अर्जदाराची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे.

वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता, शहर विभाग, कोल्हापूर यांनी दि. १२.४.२०१० चे पत्रात तक्रारदाराचे Issuewise documents  व श्री. वाय. एन. भोसले, वकील यांचे श्री. रामचंद्र शं. नलवडे यांचे बाबतीत दिलेले उत्तर हजर केले.

प्रस्तुतची तक्रार दि. ४.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्र ारदार स्वत: हजर. तक्रारदार यांनी श्री. रामचंद्र शं. नलवडे यांचे कनेक्शन बंद करावे असे मंचाकडून आदेश मिळावेत अशी मागणी केली.  तक्रारदार यांनी कोणत्या अधिकाऱ्याने कनेक्शन दिले ?  ते कूळ आहे त्याला स्वतंत्र मीटर व वेगळे कनेक्शन कसे दिले ? अशी विचारणा केली.  तक्रारदार यांनी सुनावणी दरम्यान मंचाला अग्रेषित केलेला दि. ४.५.२०१० चा अर्ज दाखल केला. त्यामध्ये अंतर्गत कक्षाने तक्रारीची दखल घेतली नाही असे दिसून येत आहे.  सदरचे कनेक्शन वैंद्य कि अवैंद्य हे मंचाने ठरवावे.  तसेच म.रा.वि.कं.कडून ज्या ग्राहकास माझ्या प्रॉपर्टीमध्ये विद्युत कनेक्शन चुकीच्या पध्दतीने दिले आहे ते  पहाता फसवणूक करणाऱ्या इसमास सोई सुविधा पुरवून कंपनी अशा प्रवृत्तीला खतपाणी घालत आहे कि काय असे वाटते.  माझी  आर्थिक परिस्थिती पहाता, सदरची प्रॉपर्टी हीच माझ्या उपजीविकेचे साधन आहे याची जाणीव ठेवून या प्रॉपर्टीत झालेल्या माझ्या फसवणूक कामी मला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती केली आहे. वि.प.तर्फे श्री. बुवा, उप कार्यकारी अभियंता यांनी श्री. रामचंद्र शं. नलवडे यांना दि. ६.४.२००२ ला कनेक्शन दिले आहे.  तक्रारदार यांनी दि. २१.८.२००६ ला अर्ज दिला, यापूर्वी कसलीही हरकत घेतली नाही, कोर्ट केस आहे. नोटीसला वकिलामार्फत उत्तर दिले आहे.  दावा क्र. १८०/२००५ प्रलंबित आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१)  तक्रार मुदतीत आहे काय ?

उत्तर :  नाही

काय आदेश ?

उत्तर :  तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

<u>कारणमिमांसा</u>

वितरण कंपनीने पॅरावाईज कॉमेंटस द्यावयाच्या ऐवजी इश्यूवाईज डॉक्यूमेंटस असा संदर्भ देवून बऱ्याच कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मंचाकडे दि. १२.४.२०१० पत्रासोबत हजर केल्या आहेत. वि.प.ने अंतर्गत कक्षाच्या आदेशानुसार कनिष्ठ विधी अधिकारी, कोल्हापूर यांचे मत मागविले. त्याचप्रमाणे सदर प्रकरणात विधी सल्लागार, कोल्हापूर झोन यांनी त्यांचे दि. २०.३.२०१० च्या पत्रानुसार असे मत मागविणे ' अन वॉरंटेड ' असे मत दिले आहे. अंतर्गत कक्षाने दिलेल्या आदेशात कायदेशीर मत मागविणे हा निर्णय होवू शकत नाही. सकृतदर्शन अंतर्गत कक्षाचे आदेश हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ नुसार नाहीत असे खेदाने नमूद करावे लागते. अंतर्गत कक्षाने कंपनीचे म्हणणे, तक्रारदाराची तक्रारनुसार कनिष्ठ विधी अधिकारी यांचे मत घेवून कार्यवाही करणेत यावी असे आदेश दिले आहेत. थोडक्यात अंतर्गत कक्षाच्या अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडण्यात कसूर केला आहे. त्यामुळे अंतर्गत कक्षाने असे कुठलेही आदेश पारित केले नाहीत असे गृहीत धरुन सदर तक्रारीबाबत विचार करणे क्रमप्राप्त होईल.

वितरण कंपनीने श्री.रामचंद्र शं. नलवडे यांना दि. १७.१०.२००६ रोजी पत्र पाठवून माहिती मागविली. त्यांस श्री. नलवडे यांनी वकिलामार्फत दि. २०.१०.२००६ वि.प.स पत्र पाठविले आहे. त्यात उत्तरादाखल नलावडे यांनी कायम मनाई होणेसाठी कौंटरक्लेम दाखल केला आहे, त्याचा रे.क.नं. १८९/२००४ असून दिवाणी न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तसेच तक्रारदार यांचे पती श्री. नामदेव कदम यांनी श्री. नलवडे यांचे विरुध्द स्पे.कनं. १८०/२००५ नुसार दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असल्याचे स्पष्ट केले आहे. यानुसार तक्रारदार सौं. सावित्रीबाई ना. कदम यांना दि. १२.१२.२००६ रोजी उप कार्यकारी अभियंता, मध्य उप विभाग, कोल्हापूर यांनी कळविले आहे की, दोन्ही दावे हे वीज कनेक्शन दिलेल्या सि.स.नं. ७९२ च्या मिळकती संदर्भात असलेचे दिसते. त्यामुळे सदर कामातील अंतिम निकालपावेतो कंपनीला या मिळकतीमध्ये श्री. नलवडे यांचे नांवे दिलेल्या विद्युत कनेक्शनबाबत कांही कारवाई करता येणार नाही. मे. कोर्टाच्या निकालाप्रमाणे पुढील कारवाई करता येईल याची नोंद घ्यावी . सबब आपला अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. वि.प.ने हजर केलेल्या कागदपत्रांवरुन श्री. रामचंद्र शंकर नलावडे यांनी दि. १२.२.२००२ रोजी एक्झीक्यूटीव्ह मॅजिस्ट्रेट, करवीर, कोल्हापूर यांच्यासमोर ॲफिडेव्हीट केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी सदर जागेत वीज कनेक्शन मिळालेनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत निर्माण झालेस त्यास मी वैंयक्तिक जबाबदार रहात असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अटी व शर्ती मला बंधनकारक असल्याचे मान्य केले आहे. खरेदीपत्राची साधी नक्कल पहातां, खरेदी देणाऱ्याच्या त्यावर सह्या नाहीत. श्री. रामचंद्र शं. नलवडे यांन दि. ६.४.२००२ रोजी वीज कनेक्शन दिलेनंतर दि. २१.८.२००६ रोजी तक्रारदार यांनी वि.प.कडे तक्रार केली असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन प्रथमत: मुद्दा क्र. २ – तक्रार मुदतीत आहे काय ? याचा विचार करणे योग्य होईल असे वाटते.

Rule 6.6 of Regulation 2006 – Forum shall not admit any grievance unless it is filed within 2 years, from the date of which, cause of action has arisen.

या केसमध्ये तथाकथित खरेदीखतबद्दल तक्रारदार यांनी सन २००४ मध्ये श्री. कोळेकर वकिलांमार्फत दावा दाखल केलेला आहे. श्री. रामचंद्र शं. नलवडे यांना दि. ६.४.२००२ ला कनेक्शन दिले आहे व तक्रारदार यांनी दि. २१.८.२००६ ला तक्रार अर्ज दिला आहे.

तक्रारदारानी मंचाकडे दाखल केलेल्या दि. १५.३.२०१० च्या अर्जात हरकत दाखल केली होती तसेच वि.प.च्या कार्यालयात अभियंत्यांना वारंवार भेटून सांगितले होते असे म्हटले आहे. त्यानंतर तक्रारदारांचा श्री. रामचंद्र शं. नलवडे यांचे कनेक्शन बंद करण्याबाबतचा अर्ज याबद्दल दिवाणी न्यायालयात सदर मिळकतीबाबत दावे प्रलंबित असल्याने श्री. नलवडे यांचे कनेक्शन बंद करणेबाबत वि.प.कडून कांही कारवाई करण्यात येणार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी सदरची तक्रार ही दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर करण्यात आल्याने कालबाह्य झाली असल्याने फेटाळणे योग्य होईल. तक्रारदाराची तक्रार मुदतीत नाही हे खेदाने म्हणावे लागते, परिणामत: ती फेटाळणे योग्य होईल.

## आदेश

१) सौं. सावित्री नामदेव कदम यांनी मंचासमोर दाखल केलेली तक्रार कालबाह्य (Time barred) असलेने फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :